दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २४४ | MAHMAR/2006/17212 | रायगड | सोमवार, दि.१ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# पनवेल बार असोशिएशनच्या अध्यक्षपदी रत्नदीप पाटील तर सचिवपदी प्रल्हाद खोपकर









**दै.रायगड नगरी | राकेश पितळे**

**पनवेल बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाच्या लढतीत ॲड.रत्नदीप पाटील यांनी थरारक विजय मिळवून सलग तीन वर्षे अध्यक्षपदी असणाऱ्या ॲड.मनोज भुजबळ यांचा २८ मतांनी पराभव केला असून भुजबळ यांच्या पॅनलमधून सात उमेदवार विजयी झाले आहेत.**






पनवेल बार असोसिएशन कार्यकारिणी निवडणूक शनिवारी घेण्यात आली. या निवडणुकीत ॲड. रत्नदीप पाटील यांच्या पॅनेलने उमेदवार उभे केले होते. मतदानाच्या वेळी पहिल्या फेरी पासूनच रत्नदीप पाटील हे आघाडीवर होते व ते ॲड. मनोज भुजबळ यांच्यासोबत झालेल्या अटीतटीच्या लढतीत २८ मतांनी विजयी झाले. ॲड.रत्नदीप पाटील यांना ५३६ मते तसेच सचिवपदासाठी प्रल्हाद खोपकर यांना ७२२, उपाध्यक्षपदासाठी सचिन म्हात्रे यांना ६०२, सहसचिव- दिपाली गावंड यांना ६०३, खजिनदार- धनराज तोकडे ८१०, सहखजिनदार पदासाठी विशाल डोंगरे यांना ६७१, ऑडिटर भूषण म्हात्रे यांना ७२४, तर सदस्यपदासाठी विजयेंद्र मुंढे यांना ५७४, इर्शाद शेख ४८८, ज्योती उरणकर ५५९, छाया म्हात्रे ४२९ मते घेवून हे विजयी झाले आहेत.

दरम्यान तरुण वकिलांना मजबूत उभं राहण्यासाठी आधार देणं, दिशादर्शन आणि न्याय मंच देणं. त्यांचा पॅनल हा स्वार्थासाठी नाही, तर बारच्या एकात्मतेसाठी आणि तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी उभा असल्याचे काम करणं, अनुभवी नेतृत्व, स्वच्छ प्रतिमा, सर्वांना न्याय देणारी भूमिका आणि कामाचा पारदर्शक पायंडा हे या पॅनलचे खरे बलस्थान आहे. म्हणूनच पनवेल बार असोसिएशनमध्ये सकारात्मक बदल, सुरक्षित व्यावसायिक वातावरण आणि तरुणांना खऱ्या अर्थाने बळ देणारे नेतृत्व हवं असल्यामुळे युवा वकिलांनी यावेळी ॲड.रत्नदीप पाटील यांना संधी दिल्याचा विश्वास वकिलांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून मुख्य निवडणूक अधिकारी ॲड.एच जे शेळके, सहायक निवडणूक अधिकारी ॲड.शशिकांत का म्हात्रे , ॲड.राजेश एस पाटील, ॲड.अनिल कुंभार यांनी कामकाज पाहिले.

# अंबरनाथ नगर परिषद निवडणूक पुढे ढकलली

**दै.रायगड नगरी | ठाणे**

शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये रंगलेला वाद, राडा-हाणामारी आणि पदाधिकार्यांची पळवापळवी या गाजत असलेली ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगर परिषद पुढे ढकलण्यात आली आहे. हायव्होलटेज ड्रामा असलेल्या अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीचा प्रचार उद्या संपणार होता. मात्र, काही तास आधीच निवडणूक ढकलण्यात आल्याने आता उमेदवारांचे टेन्शन आणखीच वाढणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा आज सुपर संडे होता. सोमवारी तोफा थंडावणार आहेत. मात्र, त्याआधीच अंबरनाथ नगर परिषदेची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे.

नगराध्यक्ष पदावरील तांत्रिक वादाचा थेट परिणाम आता अंबरनाथकरांना अनुभवायला मिळणार आहे. अंबरनाथ नगरपरिषद निवडणुका २ डिसेंबरला होणार होत्या; मात्र संबंधित वादावर दाखल झालेल्या अपीलामुळे निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेत बदल करत मतदानाची तारीख तब्बल १८ दिवसांनी पुढे ढकलली आहे. आता अंबरनाथमध्ये मतदान २० डिसेंबर रोजी होणार आहे.

अंबरनाथ नगराध्यक्ष पदावरून निर्माण झालेल्या तांत्रिक वादाने गेल्या काही दिवसांत स्थानिक राजकारण चांगलेच ढवळून निघाले होते. नगराध्यक्षांच्या पात्रतेसंदर्भात दाखल झालेल्या अपीलामुळे निवडणूक कार्यक्रमावर अनिश्चिततेचे ढग दाटून आले होते. अखेर निवडणूक आयोगाने सर्व बाजूंचा विचार करून संपूर्ण प्रक्रियेत फेरबदल करण्याचा निर्णय घेतला. स्थानिक पातळीवर ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात असल्यामुळे २ डिसेंबरऐवजी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उभ्या राहिलेल्या अपीलांच्या मुद्द्यावर राज्य निवडणूक आयोगाने निर्णायक पाऊल उचलले आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या विविध आदेशांविरुद्ध काही उमेदवारांनी दाखल केलेल्या न्यायालयीन अपीलांमुळे काही नगरपरिषद व नगरपंचायतींची निवडणूक प्रक्रिया अडकली होती. अशा ठिकाणी आता २० डिसेंबरला मतदान आणि २१ डिसेंबरला मतमोजणी होणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

### बदलापूरमधील या प्रभागातील निवडणूक पुढे ढकलली

अंबरनाथ शिवाय, कुळगाव-बदलापूर नगर परिषदेतील ६ प्रभागातील निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १५ ब, १७ अ, १० ब, ८ अ, ५ ब, १९ अ या प्रभागांचा समावेश आहे.

# संसदेचे हिवाळी अधिवेशन सोमवारपासून

## सत्ताधाऱ्यांसह विरोधकांचीही जोरदार तयारी



**नवी दिल्ली | वृत्तसंस्था**

संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सोमवार १ डिसेंबर सुरू होत आहे. बिहारमधील विधानसभा निवडणुकीनंतर होत असलेले हे अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच विविध मुद्द्यावरून सरकार आणि विरोधी पक्षांमधील वातावरण तापल्याचे पहायला मिळत आहे. दरम्यान, सोमवारपासून सुरू होत असलेले हे अधिवेशन १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

या अधिवेशनात विरोधक कोणत्याही परिस्थितीत एसआयआर (मतदार यादी विशेष सुधारणा) मुद्द्यावर चर्चेची मागणी करण्यावर ठाम असतील तर सरकारने आधीच स्पष्टपणे सांगितले आहे की सभागृहात या विषयावर चर्चा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे आणि निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे, आणि म्हणूनच, आयोगाची जबाबदारी संसदेत निश्चित करता येत नाही, असे सरकारचे मत आहे. मात्र विरोधकांनी निवडणूक सुधारणांवर व्यापक चर्चेचा प्रस्ताव ठेवला तर सत्ताधारी त्यावर विचार करू शकतात.

अधिवेशन काळात सरकार १० महत्त्वाची विधेयके मांडण्याची योजना आखत आहे, यामध्ये अणुऊर्जा क्षेत्र, उच्च शिक्षण पायाभूत सुविधा सुधारणा आणि कॉर्पोरेट/शेअर बाजार नियमन यांचा समावेश आहे. दुसरीकडे पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि केरळ सारख्या निवडणूक होऊ घातलेल्या राज्यांमध्ये एसआयआरचा मुद्दा एक प्रमुख राजकीय मुद्दा बनला आहे. संसदेत हा मुद्दा उपस्थित करून सरकारला कोंडीत पकडण्याची विरोधी पक्षाची रणनीती आहे.

एसआयआर व्यतिरिक्त, दिल्लीतील स्फोट, वाढते प्रदूषण, मतचोरी आणि बीएलओ आत्महत्या यासारख्या संवेदनशील मुद्द्यांवरही विरोधी पक्ष सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करणार आहे. दरम्यान, सरकार विरोधी पक्षांची धार कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. त्यामुळे वंदे मातरम वर विशेष चर्चा होऊ शकते अशी चर्चा आहे, ही चर्चा आपसूकच काँग्रेस आणि मित्रपक्षांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करेल.

मागील अधिवेशनाप्रमाणे, यावेळीही संपूर्ण विरोधी पक्ष एसआयआरच्या मुद्द्यावर एकजूट असल्याचे दिसून येते. कारण बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि आसाम सारख्या प्रमुख राज्यांमध्ये पुढील वर्षी विधानसभा निवडणुका होणार आहेत. विरोधी पक्षाला भीती आहे की जर त्यांनी संसदेत निवडणूक आयोगावर जोरदार दबाव आणला नाही तर निकाल बिहार निवडणुकीइतकेच आश्चर्यकारक ठरू शकतात. यावेळी, राजकीय वर्तुळात अशीही चर्चा आहे की जर परिस्थिती आणखी बिकट झाली तर विरोधी पक्ष मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणण्याचा विचारही करू शकतात.

एकीकडे सरकार प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार असल्याचा दावा करत आहे. मात्र देशातील राजकीय परिस्थितीवरून असे दिसून येते की हिवाळी अधिवेशन गोंधळ, तीव्र राजकीय संघर्ष आणि जोरदार वादविवादांनी भरलेले असेल. यामध्ये कोणाची रणनीती यशस्वी होते, हे पाहणे औत्सुकत्याचे ठरणार आहे.

# किल्ले रायगडकडे जाणारी सहलीची मिनीबस पलटी ; ६ जण जखमी



**दै.रायगड नगरी | महाड**

सांगली जिल्ह्यातून किल्ले रायगड दर्शनाला आलेल्या विद्यार्थ्यांच्या सहलीची खासगी मिनीबस नांदगाव बुद्रुक येथे पलटी झाली. या अपघातात सहाजण जखमी झाले असून यामध्ये चार विद्यार्थिनी, शिक्षक व चालकाचा समावेश आहे.

अक्षरा अजय ढोवळे (वय १६), आदिती रवींद्र खेरमोडे (वय १६), आदिती दीपक खाडे (वय १६), सिद्धी दीपक ढोवळे (वय १६), चालक योगेश वसंतराव जाधव (वय ३५), शिक्षक जगन्नाथ विश्वास येवले (वय ४५) अशी जखमींची नावे आहेत. हे सर्वजण सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील रहिवासी आहेत. जखमींवर ग्रामीण रुग्णालय महाड येथे उपचार करण्यात आले असून त्यापैकी आदिती खेरमोडे ही गंभीर जखमी असल्याने तिला सिटीस्कॅनसाठी माणगाव येथे पाठविण्यात आले.

अन्य जखमींची प्रकृती स्थिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल, बाऊच, (ता. वाळवा) या शाळेतील हे विद्यार्थी असून शनिवारी रात्री ११ वाजता ते खासगी मिनीबसने सहलीसाठी निघाले होते. पहाटे ५.५० च्या सुमारास महाडकडून किल्ले रायगडकडे जाताना नांदगाव बुद्रुक गावच्या हद्दीत आले असता चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटून बस रस्त्याच्या विरुद्ध दिशेला गेल्याने हा अपघात घडला. घटनेची नोंद महाड तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चोरीस गेलेले २२ तोळे सोने पोलिसांनी केले हस्तगत

**दै.रायगड नगरी | पनवेल**

कामोठे, सेक्टर-३५ मधील प्रतीक जेम सोसायटीत राहणाऱ्या मस्कर कुटुंबांच्या घरातून सप्टेंबर महिन्यात २२ तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी फिर्यादीच्या शेजारी राहणाऱ्या मोनिका शंतनू दिघे (४०) या महिलेला अटक करून तिच्याकडून चोरीचे २२ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. मोनिका दिघे हिला सध्या पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी मस्कर कुटुंबीयांनी २७ सप्टेंबर रोजी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंद केला होता. मात्र गुन्हा दाखल होऊनही पोलीस आरोपीपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप मस्कर कुटुंबीयांकडून करण्यात येत होता. याप्रकरणी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन तशी भूमिका मांडली होती. मस्कर कुटुंबीयांनी मोनिका दिघे यांच्यावर थेट आरोप केले होते आणि त्यांनीच दागिने चोरल्याचे पोलिसांना देखील सांगितले होते.

गुन्हा दाखल झाल्यानंतर व.पो.नि. विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला व संशयित मोनिका दिघे यांचा पोलिसांनी तपास सुरू केला. त्यानंतर कामोठे पोलिसांनी मोनिका दिघे हिला दोन महिन्यानंतर ताब्यात घेतले आणि तिची कसून चौकशी करत तिने चोरलेले २२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले.या प्रकरणात शेजारीणच चोर निघाल्याने कामोठे वसाहतीमध्ये मोनिकाविषयी उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

# अब्रूची लक्तरे वेशीवर

उद्याचे डॉक्टर जिथे घडवले जातात, त्या वैद्यकीयमहाविद्यालयांवर छापे घातले जावेत आणि कुलपतीच आरोपी असावेत, हे आजचे विदारक वास्तव आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयासह 'नॅशनल मेडिकल कमिशन'कडून होणाऱ्या तपासणीची आगाऊ माहिती खासगी वैद्यकीयमहाविद्यालयांना देऊन, त्यांना

सावध करण्याच्या बदल्यात कोट्यवधींची लाचखोरी केल्याप्रकरणी 'ईडी'ने नुकतीच कारवाई केली. धक्कादायक असे की, या आरोपींमध्ये केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आहेत. 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस' अर्थात 'टिस' ही अत्यंत ख्यातकीर्त संस्था. या संस्थेचे कुलपती या आरोपींमध्ये आहेत. सगळ्यांवरचा विश्वासच उडून जावा, अशी बातमी आहे ही! केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील आठ अधिकारी हे रॅकेट चालवत होते. आरोग्य मंत्रालयातील माहिती, फाइलची छायाचित्रे काढून ती खासगी महाविद्यालयांना पाठविण्यात येत होती. त्यामुळे, पाहणी पथकाची माहिती आधीच या महाविद्यालयांना मिळत असे. त्यानुसार, या महाविद्यालयातील अधिकारी तिथे बोगस रुग्ण, बोगस कर्मचारी दाखवत असत. हे केल्यामुळे या महाविद्यालयांना त्यांच्या कामांना परवानगी मिळणे शक्य होत होते. या माहितीच्या मोबदल्यात मंत्रालयातील; तसेच 'नॅशनल मेडिकल कमिशन'मधील उच्चाधिकाऱ्यांना लाखो रुपयांची लाच मिळत होती. राज्यांतील मेडिकल कॉलेजांवर 'ईडी'ने केलेल्या छापेमारीमुळे एक भयंकर वास्तव पुढे आले. शिक्षणपद्धतीतील भ्रष्टाचार हा आता अपवादात्मक नाही, तर तो नियमच झाला आहे. लाचखोरी, मान्यता प्रक्रियेत फेरफार, बनावट निरीक्षण अहवाल, बनावट प्राध्यापक, पालकांची फसवणूक आणि विद्यार्थ्यांच्या जागांच्या व्यापाराशी ही कारवाई निगडित आहे. फक्त महाराष्ट्रात नाही, छत्तीसगड, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, आंध्र, तेलंगणा, दिल्ली अशा राज्यांतही हेच दिसले. घोटाळ्याचा मुळातला प्रश्न हा पैशाचा नाही. तो विश्वासाचा आहे. एक विद्यार्थी एखाद्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतो, तेव्हा तो भविष्यातील रुग्णांची जबाबदारी स्वीकारत असतो. अशा क्षेत्राला जे लाचखोरीच्या जाळ्यात अडकवतात, ते थेट लोकांच्या आरोग्याशी खेळत असतात. डॉक्टर होणाऱ्यांची गुणवत्ता बनावट कागदपत्रांवर ठरत असेल तर उद्या रुग्णालयात जाणारा प्रत्येक नागरिक धोक्यात आहे.महाराष्ट्राचे उदाहरण घ्यायचे झाल्यास, गेल्या काही वर्षांत मेडिकल कॉलेजांची वाढ मोठ्या प्रमाणात झाली. राज्याने 'एमबीबीएस'च्या जागांमध्ये देशातील दहा टक्के वाटा मिळवला, पण या वाढीच्या मुळाशी भ्रष्टाचार असेल, तर ही वाढ म्हणजे विकास नव्हे. ही धोक्याची घंटा आहे. इथे हितसंबंधांची साखळी आहे. अशा प्रकारचा भ्रष्टाचार करणारे शिक्षणसम्राटच आरोग्यमंत्री होत असतील, तर या महाविद्यालयांवर कारवाई करणार कोण? पंचतारांकित रुग्णालयांकडून रुग्णांची होणारी लूट नित्याची झालेली असतानाच, डॉक्टर होण्यासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्काचे आकडे अलीकडे समोर येऊ लागले होते. तुम्ही महाविद्यालयात आला नाहीत, तरी चालेल. मात्र तुमच्याकडे पैसे हवेत. तोच एकमेव निकष, भरमसाठ पैसे मोजून डॉक्टर व्हायचे आणि मग रुग्णांनी त्याची सव्याज परतफेड करायची, असा हा धंदा आहे. आरोग्य ही सेवा नाही आणि शिक्षण हे व्रत नाही. सगळा बाजार आहे. बाजारही असा की, तिथे काही नियंत्रण नाही. निर्बंध नाहीत. ना राज्याचे नियंत्रण, ना केंद्राचे. खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील भरमसाठ फी आणि प्रवेशासाठी अतिरिक्त शुल्क आकारण्याची लूट काही वर्षांपासून सुरू आहे. यासंदर्भात बोलले जात होतेच. आता या कारवाईने या विषयाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षाही अनेक महाविद्यालये जास्त फी वसूल करत असल्याच्या तक्रारी होत्याच; मात्र या संस्थाचालकांना राजकीय आश्रय असल्याने काही कारवाई होत नाही. हा मुद्दा सामाजिक न्यायाचाही आहे. ताजी बातमी क्लेशकारक खरीच; पण तेवढीच ती आश्वासक आहे. या कारवाईने आपल्या व्यवस्थेचा खरा चेहरा समोर आणला आहे. अनेकांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. स्वतःला दिमाखात मिरवणाऱ्यांची खरी लायकी लोकांसमोर आली आहे. हे होणे आवश्यक होते. आता या आरोपींना अजिबात पाठीशी न घालता, त्यांना कडक शिक्षा व्हायला हवी. ही पूर्ण प्रक्रिया पारदर्शक झाल्याशिवाय, निरोगी समाज निव्वळ अशक्य आहे.

# पोलादपूर घरपट्टी वाढीविरोधातील शिष्टमंडळाचे मंत्री दर्जाचे गटनेते प्रवीण दरेकर यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर ।** नगरपंचायत पोलादपूरतर्फे भाडेतत्वावर आधारित २१ टक्के घरपट्टीवाढ करताना नागरिकांवर मोठया स्वरूपाचा जिझिया मालमत्ताकर आकारण्याच्या नोटीसा पाठविण्यात आल्याने पोलादपूरकरांनी पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे सुरू केलेल्या आंदोलनाचा भाग म्हणून पोल-ादपूर तालुक्याचे भूमिपुत्र आणि स्वनिधी पुनर्निर्माण महामंडळाचे अध्यक्ष तथा विधानपरिषदेतील भाजपचे गटनेते प्रवीणभाऊ दरेकर यांना शिष्टमंडळाने निवेदन देऊन घरपट्टी वाढीच्या समस्येबाबत विस्तृत चर्चा केली. पोलादपूर नगरपंचायतवर नागरिकांनी काढलेल्या मोर्चाबद्दल माहिती घेतल्याचे यावेळी प्रवीणभाऊंनी शिष्टमंडळासोबत या चर्चेत सांगून मिळकतकर वाढीबाबतचे नागरिकांवर अन्याय करणारे मुद्दे जाणून घेण्यासाठी चर्चा केली. मिळकतींचे पुनर्मूल्यांकन



करून कर आकारणी केली तरी आपोआपच रक्कम कमी होईल तसेच पुनर्मुल्यांकन अथवा पुनर्मोजणी प्रक्रियेसाठी एक समिती गठित करून त्यामध्ये पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाचे दोन सदस्य समाविष्ट करण्याची मागणी असल्याचे यावेळी शिष्टमंडळातील निमंत्रक दर्पण दरेकर, सनी विचारे तसेच ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी सांगितले.

यासंदर्भात पोलादपूर नगरपंचायतीच्या जनरल बॉडीच्या सभेमध्ये ठराव करण्यापासून तो ठराव रायगड जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मान्य करून याआधीची मुल्यांकन व मोजणीप्रक्रिया चुकीची असल्याने तक्रार अथवा आक्षेपाविना सरसकट रद्द करण्याची तजवीज शासनपातळीवर होण्यासाठी शिष्टमंडळाला प्रवीण दरेकर यांनी सहमती दर्शविली. पोलादपूर तालुक्याप्रती आणि पोलादपूरकरांप्रती असलेल्या विशेष जिव्हाळयामुळे प्रवीण दरेकर यांनी याप्रश्नी लवकरच रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासह मुख्यमंत्री ना.फडणवीस यांना पत्र लिहून लक्ष घालण्याची भूमिका यावेळी स्पष्ट केली.

# बनावट आरटीजीएस मारून दहा लाख ६६ हजारांची केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोन्याचे बेबी टॉप्स तसेच नोजपीन यांच्या ऑर्डर देऊन त्या बदल्यात चेक दिला आणि बनावट आरटीजीएस मारून फसवणूक करून दहा लाख ६६ हजारांची ज्वेलरी घेऊन नेल्याप्रकरणी जानू उर्फ तनिष सुधीर छाजेड याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २७ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

भगाराम देवासी हे खारघर, सेक्टर २० येथे राहत असून त्यांचा सोन्याचा दागिन्यांचा ट्रेडिंगचा व्यवसाय आहे. यांच्या व्हाट्सअपवर छाजेड कुंदन ज्वेलर्स रतलाम या नावाच्या मोबाईल क्रमांकावरून जानू उर्फ तनिष सुधीर छाजेड याने सोन्याचे बेबी टॉप्स तसेच नोजपीनची ऑर्डर दिली. व्यवहार झाल्याने चेक दिला आणि चेक न टाकण्यास सांगितले. तसेच ऑर्डर नेताना आरटीजीएस करून चेक परत घेऊन जाईन असे सांगितले.

२२ नोव्हेंबर रोजी ऑर्डर डिलिव्हरीसाठी कॉल आला आणि त्याप्रमाणे भगाराम यांचा भाचा चतराराम हा ऑर्डरचे पार्सल एकूण दहा लाख ६६ हजारांची ज्वेलरी ही जानू उर्फ तनिष त्याच्या ताब्यात दिली आणि फर्म रामदेव आर्ट डायमंडचे अकाउंट यावर आरटीजीएस युआरटी नंबर पाठवला.

यावेळी बँक बंद असल्यामुळे दोन दिवस थांबून बँकेत जाऊन यूटीआर कन्फर्म केला असता तो बनावट असल्याचे बँकेत सांगितले. बँकेत चेक टाकला असता तोही बाऊन्स झाला.

# दोन ट्रेलरमध्ये दबून इसमाचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्टील मार्केट, कळंबोली येथे पेंटिंग करीत असलेल्या तीस वर्षीय तरुणाला ट्रेलरने पाठीमागून धडक दिल्याने दोन ट्रेलरमध्ये दबून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. मनोज कुमार रामबक्स असे त्याचे नाव आहे. मनोज कुमार रामबक्स आणि मोहम्मद हे दोघे स्टील मार्केट, रोड नंबर २ च्या पदपथालगत ट्रेलर पेंटिंग करीत होता.

या ट्रेलरच्या मागे सहा फूट अंतरावर दुसरा ट्रेलर उभा होता. मनोज कुमार हा ट्रेलरच्या मागील बाजूस पेंटिंग करीत असताना मोना वेअर हाऊसकडून येणारा ट्रेलर भरधाव वेगात वळण घेत असताना चालकाचे नियंत्रण सुटले व त्याने दुसऱ्या ट्रेलरला पाठीमागून ठोकर मारली. तो ट्रेलर मनोज कुमार पेंटिंग करीत असलेल्या ट्रेलरला जाऊन धडकल्याने मनोज कुमार हा दोन्ही ट्रेलरमध्ये दबून गंभीर जखमी झाला व त्यातच त्याचा मृत्यू झाला.

याप्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ट्रेलरने केले खारघर, कोपरा टोलनाक्याचे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बस आणि कारसाठी असलेल्या मार्गिकेत ट्रेलर घुसल्याने टोल नाक्याच्या बूथ केबिनचे व इतर सामान असे जवळपास तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे .

खारघर कोपरा टोल नाका येथे पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिका क्र. ९ वरुन चाललेल्या ट्रेलर चालकाला अंदाज न आल्याने त्याने कार व बससाठी असलेल्या मार्गीकेत आपला ट्रेलर घुसवला. मात्र, या ट्रेलरचा आकार मोठा असल्याने ट्रेलने टोल नाक्याच्या बूथला जोराची धडक दिली.

या धडकेत येथील बूथ केबिन क्र. १० खाली कोसळली. तसेच केबिनमधील संगणक, प्रिंटर, सीसीटीव्ही कॅमेरा, लेन कंट्रोल सिस्टीम, पॅनल, फॅन, केबिन गार्ड, टोल नाक्याच्या केबिनचे सपोर्ट पोल हे दबून चेपले आणि तीन लाखांचे नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत जीवित हानी टळल्याचे पोलिसानी सांगितले आहे. या प्रकरणी ट्रेलर चालक अब्दुल तालीम अब्दुल कादिर (रा. उत्तर प्रदेश) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. गजानन भानुदास जाधव राहणार रुम नं -१३, प्लॉट नं. २५, श्रध्दा को-ऑप हौसिंग सोसायटी लिमीटेड, सेक्टर - १३, कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८ यांची परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत माहो अशिल १) श्री. चंदन गुप्ता २) श्री. संदीप गुप्ता, दोघही राहणार भरत सुनिल गोवारी चाळ, रुम नं. ०१, सेक्टर -१४, शिवमंदीर जवळ कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१८ यांनी करारनामा करुन विकत घेण्याचे ठरवलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**युनिट नं.१३, प्लॉट क्रमांक - २५,**
**श्रध्दा को-ऑप हौसिंग सोसायटी लिमीटेड.,**
**सेक्टर-१३, कळंबोली,**
**ता. पनवेल, जि. रायगड,**
**क्षेत्रफळ - २८.०० चौ.मी. (बिल्ट अप एरिया)**

वर वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सदर जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास हि नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे ०७ दिवसात खालील पत्त्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाहीं. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडुन दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

दि.३०/११/२०२५
ठिकाण : कळंबोली

**सही/-**
**ॲड.सुनिल एन. मोरे**
**ऑफीस नं. ३०६०, बिमा कॉम्पलेक्स,**
**सेक्टर के डब्ल्यु सी, कळंबोली ता. पनवेल,**
**जि. रायगड - ४१०२१८**
**मो. ८३६९४६५७९९**

ॲड.साहिल मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (क) स्तर यांचे कोर्टात
चौ. अर्ज क्रं. ११९४/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.१२/१२/२०२५

१. श्रीमती. शोभा गणपत साटम
रा. सी. ५, अंबेडकर नगर,
हाफकीन कंपनी जवळ, परेल, मुंबई ४०००१२ — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविणेत येत आहे की, वरील अर्जदार ही मयताची वारस पत्नी आहेत. कै. गणपत मारूती साटम यांचा मृत्यू दिनांक १७/०९/२०१८ रोजी राहत्या घरी अंबेडकर नगर, जी. डी. अंबेडकर मार्ग, परेल, मुंबई येथे झाला आहे. अर्जदार श्रीमती. शोभना गणपत साटम हया कायदेशीर वारस आहेत.

**मिळकत वर्णन**

**सर्व्हे नं. १७०/६८**
**मौजे : कर्नाळा, ता. पनवेल, जि. रायगड**

येणे प्रमाणे सदनिका ही मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमिनीचे अनुषंगाने वारस दाखला मिळणे करीता अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै. गणपत मारूती साटम यांचे वारस नाहीत असे अगर यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृति धरून मे. न्यायालय अर्जदार यांस वारस दाखल प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २० माहे ११ सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# तरुण दोन ट्रेलरमध्ये चिरडला, जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्टील मार्केट, कळंबोली येथे पेंटिंग करत असलेल्या तीस वर्षीय तरुणाला ट्रेलरने पाठीमागून धडक दिली. आणि दोन ट्रेलरच्या मध्ये दबून तो गंभीर जखमी झाला. यात या तरुणाचा मृत्यू झाला. मनोज कुमार रामबक्स असे मृत कामगाराचे नाव आहे. या अपघाता प्रकरणी ट्रेलर क्रमांक पिबी ०५ ए एल ७२२२ वरील चालकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २६ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मोना वेअर हाऊस कडून येणारा ट्रेलरने जोरात वळण घेतले आणि त्याला ट्रेलर कंट्रोल न झाल्याने त्याने दुसऱ्या ट्रेलरला पाठीमागून ठोकर मारली. तो ट्रेलर मनोज कुमार पेंटिंग करत असलेल्या ट्रेलरला जाऊन धडकल्याने मनोज कुमार हा दोन्ही ट्रेलरमध्ये दबून गंभीर जखमी झाला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व १) सुरेखा अनिल देशमुख २) अश्विनी अशोक सुर्यराव ३) लक्ष्मण रघुनाथ देशमुख ४) रुपाली संभाजी घोरपडे ५) मनिषा विनोद देशमुख ६) अभिजीत दिलीप देशमुख ७) आदित्य दिलीप देशमुख ८) जयंती दिलीप देशमुख ९) संजीत विनोद देशमुख १०) ओमकार विनोद देशमुख, सर्व राहणार- रा. उलवे, नवी मुंबई - ४१० २०६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. शालोम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) एलदो ईडायतुकूडी चाको २) मिथून नागेश शेरखाने यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २१८६ | २०.११.२०२५ | पुष्पक नोड | २६ | ३६६ | ४००.०० चौ. मी पैकी २००.०० चौ. मी | १६.०६.२०२५ | २६.०६.२०२५ २७.०६.२०२५ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३८५/२०२५-२६

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ मालक १) श्री. किशोर गिरधारीलाल खुबचंदानी, २) डॉ. अंजली श्रीराम खाडिलकर यांचे मालकीची खालील वर्णनाच्या एकुण क्षेत्रापैकी श्री. किशोर गिरधारीलाल खुबचंदानी यांच्या हिश्यास येणारे क्षेत्र ०-८८-०० हे.आर. हि जमीन मिळकत आमचे अशिल यांनी खरेदी करण्याविषयक मुळ मालक यांच्या समवेत करार करणार आहोत. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नडोदे, ता.खालापूर, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५७/२ | वर्ग १ | लागवडी योग्य ०-९३-४० पोटखराबा ०-१६-४० एकूण १-०९-८० पैकी क्षेत्र ०-८८-०० हे.आर. | ५.२४ |

वर वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, भाडेपटटा, चार्ज, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे ०७ दिवसात खालील पत्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडुन दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध निर्विधात आहे असे गृहीत धरून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : खालापूर
दि.३०/११/२०२५

**सही/-**
**ॲड.विकास अशोक बडे**
**बी.ए. एल.एल.बी.**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस : गाळ नं. १, समर्थ शिवराम मार्केट, मेन बाजार पेठ,**
**मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड ४१०२२२.**
**मो.नं. ९६६५१९७२३१, ८८८८१३३४०२**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळवण्यात येत आहे की, १) श्रीमती चांगुणा भगवान जितेकर २) श्रीमती अनुसया नारायण कुडावकर ३) श्री. गजानन बाबू कुडावकर ४) श्रीमती मैनाबाई बाबू कुडावकर ५) श्रीमती भिमाबाई बळीराम पाटील ६) श्रीमती द्रौपदी विश्वनाथ गायकवाड ७) श्रीमती गंगाबाई रोहिदास पाटील ८) श्रीमती नर्मदा उर्फ राजश्री रामचंद्र दमडे ९) श्रीमती जनाबाई उर्फ ज्योत्सना धर्मा पाटील १०) श्री. कृष्णा उर्फ किसन बाळा कुडावकर ११) श्री. महादेव बाळा कुडावकर १२) श्रीमती यशोदा हनुमंत घोपरकर १३) श्रीमती सुरेखा दिलीप घरत १४) श्री. अशोक नारायण कुडावकर १५) श्रीमती सपना वासुदेव पाटील १६) श्रीमती सुनंदा रमेश भगत १७) श्री. किशोर नारायण कुडावकर १८) श्री. सुर्यकांत नारायण कुडावकर १९) श्रीमती राजश्री राजेश ठाकूर २०) श्रीमती मनाली महेश कोकंबे २१) श्रीमती सुचिता सतिश पाटील २२) श्री. रजनिकांत जनार्दन माळी २३) श्री. कौस्तुभ जनार्दन माळी २४) श्रीमती चंद्रभागा रघुनाथ जितेकर यांच्या व त्यांच्या पूर्वजांच्या नावे असलेली जमीन मिळकत शासनाद्वारे नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादीत झालेली असुन सदर भूसंपादनाच्या मोबदल्यात सिडको प्राधिकरणाकडून १२.५ टक्के भूखंड योजने अंतर्गत १०९९.७२ चौरस मीटर क्षेत्रफळाचा भूखंड उलवे नोड मधील सेक्टर क्रमांक १० बी, भूखंड क्रमांक २ ए येथे वितरीत झालेला आहे. सदर भूखंड आमचे अशिल आणि भूखंड धारक यांच्यामध्ये सिडको लि. यांच्या परवानगीने त्रिपक्षिय कारारनाम्याद्वारे आमच्या अशिलांच्या नावे कायमस्वरूपी हस्तांतरण करून घेणार आहेत.

तरी कोणीही व्यक्ती, कंपनी, फर्म किंवा आर्थिक संस्थांचे सदर भूखंडासंदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, बक्षीस, भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत या भूखंडाच्या संबंधीत कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भूखंडाची त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/११/२०२५

**सही/-**
**ॲड.किशोर कान्हा पाटील**
**ऑफिस क्रमांक १०९, पहिला मजला,**
**नगरपालिका शॉपींग कॉम्प्लेक्स, श्री दत्त झेरॉक्स जवळ, ओल्ड पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.**
**संपर्क - ९६१९१११२१५५.**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

### उमेदवारांच्या प्रचारासाठी रोह्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची रॅली

# बदल हवा असेल तर युतीच्या उमेदवारांना निवडून द्या : ना. एकनाथ शिंदे



**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहेकरांना कोणाच्या दहशतीला घाबरण्याची गरज नाही, तुमच्यापाठीशी आम. भरतशेठ आहेत, आम. महेंद्रशेठ आहेत आणि मी स्वतः एकनाथ शिंदे आहे. रोह्यात विकासाचा प्रवाह आणून परिवर्तन घडवायचा असेल तर युतीच्या सर्व उमेदवारांना या निवडणुकीत विजयी करा असे जाहीर आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी रोहा येथे केले.

रोहा नगरपालिका निवडणुकीतील शिवसेना-भाजपा युतीच्या उमेदवरांच्या प्रचार्थ रोह्यात रॅली काढण्यात आली. तत्पूर्वी ना. एकनाथ शिंदे व अन्य मान्यवरांनी ग्रामदैवत श्री धावीर महाराजांचे दर्शन घेतले. त्यानंतर धावीर मंदिर ते फिरोज टॉकीज नाका, तीन बत्ती नाका, मुख्य बाजारपेठ, श्री राम मारुती चौक येथून बाळासाहेब ठाकरे चौक येथे रॅलीचे समारोप करण्यात आले. यावेळी यावेळी मंत्री भरत गोगावले, आम. महेंद्र दळवी, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, तालुका प्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे,भाजपा तालुका अध्यक्ष अमित घाग, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. शिल्पा धोत्रे व नगरसेवक पदाचे उमेदवार उपस्थिती होते.

यावेळी संबोधित करताना ना. एकनाथ शिंदे म्हणाले की मी नगरविकास खात्याचा मंत्री आहे. त्यामुळे रोह्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. असा दावा देखील केला. ते पुढे म्हणाले की, आरोग्य मंत्री देखील आपलेच आहेत. त्यामुळे रोह्यात सुसज्ज हॉस्पिटल बांधणार व त्याशिवाय रस्ते, शुद्ध पाणी, प्रदूषणमुक्त कुंडलिका नदी इत्यादी नागरिक समस्या हमखास सोडवणार अशी ग्वाही त्यांनी दिली. रोह्यात बदल घडवायचा आहे, हा बदल घडवण्यासाठी नगर विकास खात्यातून जितका निधी पाहिजे तितका निधी दिला जाईल असे आश्वासन देत रोह्यात विकासाचा प्रवाह आणून परिवर्तन घडवायचा असेल तर युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. शिल्पा धोत्रे यांच्यासहित नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना या निवडणुकीत विजयी करा असे जाहीर आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी केले.

# कार व बस लेनमध्ये ट्रेलर घुसल्याने टोलनाक्याचे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बस आणि कारच्या लेनमध्ये ट्रेलर घातल्यामुळे टोलचे बूथ केबिन आणि इतर सामानाचे नुकसान झाले. तीन लाख रुपयाचे नुकसान झाल्या प्रकरणी ट्रेलर चालक अब्दुल तालीम अब्दुल कादिर (राहणार उत्तर प्रदेश) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २८ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर कोपरा टोल नाका येथे मुंबईकडे येणाऱ्या लेनवर अचानक मोठा आवाज झाला. यावेळी पुण्याकडून मुंबईकडे येणाऱ्या लेन क्रमांक नऊवर ट्रेलर क्रमांक एम एच ०१ ईयू ५९२२ या सफेद रंगाच्या ट्रेलर चालकाने त्याचे वाहन कार आणि बस लेनमध्ये घुसवले आणि टोल नाकयावरील बूथ केबिन क्रमांक १० जमिनीपासून उखडले. केबिन मधील संगणक, प्रिंटर, सीसीटीव्ही कॅमेरा, लेन कंट्रोल सिस्टीम, पॅनल, फॅन, कॅबिन गार्ड, टोल नाक्याच्या केबिनचे सपोर्ट पोल हे दबून चेपले आणि तीन लाख रुपयांचे नुकसान झाले.

# ज्येष्ठांचा सन्मान हा देशाचा अभिमान- राष्ट्रीय अध्यक्ष विजय दादा देशमुख

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई ।** भारतीय वर्षा वरील प्रत्येक व्यक्ती जेष्ठ नागरिकत्वास पात्र असेल त्यांना शासकीय कोषातुन दरमहा १० हजार रुपयांपर्यंत मानधन, आरोग्य, व्यक्तीगत संरक्षण, रस्त्यावर पादचारी मार्ग, सामाजिक आदर,ऑट्रासिटी कायद्याच्या धर्तीवर विशेष आचार संहिता देऊन सर्वा साठी केंद्रसरकार व महाराष्ट्र सरकारने कॅबिनेट दर्जाचे स्वतंत्र मंत्रालय द्यावे.अशी मागणी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली असल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष विजय दादा देशमुख यांनी दिली असून त्याचे सोबत राष्ट्रीय माध्यम संयोजक जेष्ठपत्रकार,संपादक डॉ . जयपाल पाटील,ईस्टीम २डेचे संजय जोशी हे उपस्थित होते.

अर्थक्रांती व भारतीय जेष्ठ नागरिक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण देशभरात भारतीय स्त्री-पुरूष शेतकरी,मजूर, व्यापारी, उद्योजक यांना जात,धर्म, प्रांत भाषा यांचा भेदभाव न करता त्यांना दर महा १० हजार रुपयांपर्यंत मानधन द्यावे, त्याच्या सन्मानासाठी आचार संहिता बनवावी यासाठीचे निवेदन पंतप्रधाननरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना दिले असून संपुर्ण देशभरात आंदोलन करण्यात येत आहे,राजे छत्रपती शिवाजीमहाराज यांना गडावर नतमस्तक होऊन रायगड जिल्ह्यात या आंदोलनाचा शुभारंभ होणार आहे.यासाठी सामान्य सभासद वर्गणी वार्षिक रु.२०/- व पदाधिकारी रु.५००/-घेण्यात येणार आहे.संघटनेचे कार्य सन २०१५ पासून सुरु असून धर्मादाय आयुक्त लातूर येथे नोंदणी केलेली आहे. केंद्र सरकार आमच्या प्रस्तावाचा गांभिर्याने विचार करत आहे.असे राष्ट्रीय अध्यक्ष विजय दादा देशमुख यावेळी म्हणाले तर महाराष्ट्रात जेष्ठ नागरिक संघटना आहेत,पण त्याची वर्गणी शेतमजूर, शेतकरी यांना खिशाला परवडत नाही म्हणून संस्थेने अल्प वर्गणी ठेवली आहे.त्यानां शासनाकडून मिळणाऱ्या सुविधा मिळवुन देण्यासाठी आमचे सेवाभावी पदाधिकारी देशभरात जोडले आहेत.असे संजय जोशी यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पिरकोन तालुका उरण जिल्हा रायगड, येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही १. सुनिल गजानन घरत २. अशोक गजानन घरत ३. अरुण गजानन घरत ४. सविता कमळाकर ठाकुर ५. शैला पांडुरंग पाटील यांच्या मालकीची मिळकत आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| पिरकोन | ८४ | ५ | ०.२५.०० | ०.०३.०० | ०.२८.०० | ०.६९ |

वर नमुद केलेली मिळकत यांच्या कब्जेदारांच्या मालकी हक्कात व कब्जे वहीवाटीत आहे सदरची मिळकत आमचे अशिल यांच्या सोबत खरेदी देण्याबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वे ध असल्याबद्दल विद्यमान मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, साठकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्गेज, संपादन भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या हरकती खालील पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधुन कायदेशीर पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरुन, तसेच त्यासंबधी कोणचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरण्यात येईल, तसेच मागाहुन येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

सदरची पेपर नोटीस देण्यात माझी कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तकार नाही, म्हणुन मी या जाहीर नोटीसीवर सही करत आहे.

ठिकाण : उरण
दि.३०/११/२०२५

सही/-
**ॲड.स्वाती दि. कांबळे**
९९२०९५३१०२

# सोनसाखळी खेचून तिघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पायी जाणाऱ्या ६९ वर्षीय वृद्धेच्या गळ्यातील सोनस-खळी खेचून चाकीवरून आलेले तीन चोरटे भरधाव वेगात पसार झाल्याची घटना कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

संगीता वानखेडे असे वृद्धेचे नवा असून, त्या कामोठे, सेक्टर-२१ येथे राहतात. सकाळी नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकला गेल्या होत्या. त्या खांदेश्वर रेल्वे स्थानक येथील पार्किंगकडून जेएनपीटी रोडकडे जात आल्या व तेथून सेक्टर-२५ येथून चालत जात असताना त्यांच्याशेजारी एक दुचाकी येऊन थांबली व संगीता यांना काही समजण्याआधीच त्यातील एकाने संगीता यांच्या गळ्यातील सोनस-खळी खेचून भरधाव वेगात दुचाकीवरून पसार झाले. या घटनेत संगीता यांच्या मानेला जखम झाली.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व १) भास्कर काशिनाथ भगत २) प्रभाकर काशिनाथ भगत ३) बापु शंकर भगत ४) बाळकृष्ण काशिनाथ भगत ५) सुरेश काशिनाथ भगत ६) श्रीधर काशिनाथ भगत ७) प्रल्हाद काशिनाथ भगत ८) यशोदा काशिनाथ भगत उर्फ सुनिता रेवनाथ पाटील ९) इंदुबाई रामनाथ भगत १०) अमर रामनाथ भगत ११) मच्छिंद्र रामनाथ भगत १२) मंदार रामनाथ भगत १३) वैशाली नामदेव मढवी १४)वैजंती संदिप नाईक १५) शिवजी विश्वनाथ भगत १६) राजू विश्वनाथ भगत १७) अरुण जगन्नाथ भगत १८) रघुनाथ जगन्नाथ भगत १९) रतन जगन्नाथ भगत २०) प्रमोद जगन्नाथ भगत २१) गोपाळ जगन्नाथ भगत २२) संतोष जगन्नाथ भगत २३) सुशीला हरिचंद्र भगत २४) रंजीत हरिचंद्र भगत २५) मेघा नारायण पाटील २६) निलम संतोष पाटील २७) पुनम महेश घरत २८) कोमल रूपेश ठाकूर २९) पुष्पा उर्फ पुष्पाबाई शशिकांत घरत ३०) सुनीता राजेश घरत उर्फ सविता राजन घरत ३१) शैलेश नामदेव घरत ३२) कांतीलाल उर्फ कांता वसंत भगत ३३) गणेश वसंत भगत ३४) जयेंद्र वसंत भगत ३५) गंगाबाई वसंत भगत ३६) शोभा दीनानाथ कडू, सर्व राहणार - गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड- ४१० २०६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. होम रियल्टी तर्फे भागीदार **१) शिवजी आंबा गामी २) धनजी मांडन पटेल** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २२०० | २४.११.२०२५ | पुष्पक नोड | २७ | ५१ | ७००.०० चौ. मी. | १८.०८.२०२५ | १६.०९.२०२५ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३८१/२०२५-२६

# प्रारंभ फाउंडेशनमार्फत विद्यार्थिनींना स्वच्छता मार्गदर्शन कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील लोहारे येथील श्रीराम विद्यालय येथे विद्यार्थिंनींना मासिक पाळी स्वच्छता व आरोग्य विषय मार्गदर्शन कार्यक्रम प्रारंभ फाउंडेशनमार्फत आयोजित करण्यात आला. या उपक्रमामध्ये इयत्ता आठवी ते दहावीमधील विद्यार्थिंनींसाठी सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींमध्ये त्यांच्या शारिरीक तसेच अवयव स्वच्छतेविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने प्रारंभ फाउंडेशन महाड यांच्यावतीने डॉ. प्राजक्ता रहाळकर यांनी मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी राखायची शारिरीक स्वच्छता व आरोग्य तसेच विविध साधनांविषयी मार्गदर्शन केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, माझे अशिल यांच्या सांगण्यावरून खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत संतोष चाया भोपी व इतर (अविभाज्य क्षेत्राची संपूर्ण विक्रीसाठी) यांचे खरेदी मालकी हक्क व कब्जेवहिवाटीचे असून आमचे अशिलांसोबत खालील नमूद मिळकत ही विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्रद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास सबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशील ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा. रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे जुई, येथील मिळकत भूमापन /सर्व्हे नं. ५६/२ यांसी एकूण क्षेत्र ०.४२.८० (हे.आर.प्र.) व पोटखराबा ०.०६.६० (हे. आर.प्र.), आकार रक्कम रुपये ३.१२ पैसे पैकी खाता क्र. २२४६ चे (अविभाज्य क्षेत्राची संपूर्ण विक्रीसाठी), यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख ३० नोव्हेंबर २०२५

सही/-
**श्री.विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

ॲड.केवल गावंड

## जाहीर नोटीस

उरण येथील मे दिवाणी न्यायाधिश क स्तर साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.३१६/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०१/२०२६

१. श्री. शंकर धर्मा घरत
२. श्री ज्ञानेश्वर धर्मा घरत
३. श्री. सोपान धर्मा घरत
अर्जदार क. १ ते ३ राहणार
मु. रांजणपाडा, ता-उरण, जि. रायगड
४. सौ संगिता वासुदेव घरत
राहणारः फणसापूर, ता-अलिबाग, जि. रायगड.
५. कै. विष्णु धर्मा घरत मयत तर्फे वारस
५/१. श्रीमती नामूबाई विष्णु घरत
५/२. श्री. मिथुन विष्णु घरत
अर्जदार क.५/१ व ५/२
राहणार मु. रांजणपाडा, ता-उरण, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. धर्मा पांडू घरत यांचे दिनांक २४/०२/१९८६ रोजी मौजे रांजणपाडा, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै. धर्मा पांडू घरत यांची पत्नी के जानकुवाई धर्मा घरत यांचे दिनांक २९/०९/२०१४ रोजी मौजे- रांजणपाडा, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै. धर्मा पांडू घरत यांचा मुलगा कै विष्णु धर्मा घरत यांचे दिनांक १७/०९/२००९ रोजी मौजे रांजणपाडा, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे तसेच कै धर्मा पांडू घरत यांची आई कै पदीबाई पांडु घरत यांचे सुमारे ५० ते ६० वर्षापुर्वी कै धर्मा पांडु घरत यांच्या मृत्युपुर्वीच निधन झालेले होते कै धर्मा पांडु घरत यांना अर्जदार क.१ ते ५/२ हे कायदेशिर वारस आहेत. कै धर्मा पांडु घरत यांच्या सहमालकीची व ताबे कब्जे वहीवाटीतील शेत जमिन मिळकत खालील वर्णन केल्या प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे/यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | जासई ३४०/२४३ | ४ ग | ७ | ०-४६-३ |
| २ | जासई ४७६/२३६ | ४ ग | ९ | ०-७४-९ |
| ३ | जासई १२७/२८२ (२) | १५ | १३ | ०-१८-० |
| ४ | जासई २५९/२८७ | ४ इ | ४ | ०-०३-३ |
| ५ | जासई ३७/२५६ | १५ | ७ | ०-२४-८ |
| ६ | जासई २३९/२१३ | १५ | ८ | ०-०८-१ |
| | | १५ | ११ | ०-१६-४ |

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वःत अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हस्कृती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख २७ माहे ११/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**क.लिपीक**<br>**दि.न्या.क.स्तर, उरण** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-**<br>**सहा.अधिक्षक**<br>**दि.न्या.क.स्तर, उरण** |

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून विकत घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणीकामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबधी ही जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहे.

**मौजे- तुराडे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पैसे | भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १२/२ ब | ५६४०.०० | ५६४.०० | मे. रॉयल होम्स् तर्फे भागीदार<br>१) श्री. मुलचंद पी शाह<br>२) मे.कॉमॅक्स बिल्डकॉन एलएलपी तर्फे भागीदार श्री. राजेश डी. भद्रा |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान मक्ता, वहिवाट, ताबा देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकंनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/११/२०२५

सही/-
**ॲड.अमोल पवार**
**पहिला मजला, अवमेध व्हिला, सेक्टर १२, प्लॉट १२, नवीन पनवेल (पूर्व)**
**जि.रायगड ४१०२०६**
**मो. क्र ९८३३७३७९२२**

मा.पवार मॅडम कोर्ट
Adv. Manissh Assarkar

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE SENIOR DIVISION AT PANVEL

Misc. Application No. 1434/2025
Exh No.7/D
N.D. 15/01/2025

1.Pratibha Purushottam Dalal
Aged 75 Years, Hindu,
Adult Indian Inhabitant
Occupation: Housewife,
Residing at: PL-5-37-5,
Sec 17, New Panvel, Panvel,
Raigad, Maharashtra 410206 — Applicant No.1
2. Prashant Dalal
Aged 53 Years, Hindu,
Adult Indian Inhabitant
Occupation: Service,
Residing at: 202, Plot No. 8,
Sector 12, Matheran Road,
Nr. Petrol Pump, New Panvel,
Adai, Raigad, Maharashtra 410206. — Applicant No.2
3. Nishant Purushottam Dalal
Aged 49 Years, Hindu,
Adult Indian Inhabitant
Occupation: Service,
Residing at: Flat Number 1803,
Prajapati Opal, Plot No. 172 174,
Sector 10, New Panvel,
VTC: Panvel, Maharashtra 410206 — Applicant No.3
4. Rohini Mohan Khedkar
Aged 60 Years, Hindu,
Adult Indian Inhabitant
Occupation: Housewife,
Residing at: Reliance CHS,
Building No. 1, Block No.11,
Chaitra Marg, Sector 2,
VTC New Panvel,
Maharashtra, 410206 — Applicant No.4
5. Pournima Mukesh Mahajan
Aged 55 Years, Hindu,
Adult Indian Inhabitant
Occupation: Housewife,
Residing at 76,
Shriram, Krishnarpan Colony,
VTC: Amravati,
Maharashtra 444607. — Applicant No.5
Versus
Non-Applicant — NIL

The above named Applicants has filed an Application for grant of Heirship Certificate in respect of the deceased Mr. PURUSHOTTAM HARIBHAU DALAL, WHO EXPIRED ON 09th JANUARY 2017 AT PANVEL & left behind the Property, more specifically described in Schedule - I

| Sr.No. | PARTICULARS OF IMMOVABLE PROPERTY |
|---|---|
| 1 | 50% of PL-5/37/5, 1st Floor, Sec 17, New Panvel, Raigad, Maharashtra 410206, and pro-rata undivided interest in the leasehold land appurtenant to the said Apartment Unit and to the common areas and facilities of the said Apartment as specifically described in Deed of Apartment dated 16th June 1996 executed between Mr. Shaikh Abdul Rashid and Mr Dalal Purushottam Haribhau and Mrs. Dalal Pratibha Purushottam. (Balance 50% of the said Apartment and share in the land is owned by the Applicant No. 1). |

**SCHEDULE I**

If any one claim, interest, share in respect of Property mentioned in the Schedule of Property, should appear in person or through their Advocate within 30 days from the publication of this Notice, if no one appears and objects the Application, this Court will proceed to pass necessary orders.

Given under my hands and seal of this Court on 29/11/2025 this day of 2025.

| | | |
|---|---|---|
| **Sd/-**<br>**Jr.Clerk**<br>**Civil Court S.D. Panvel** | **Court Seal** | **Sd/-**<br>**Asst.Supted.**<br>**Civil Court S.D. Panvel** |

### महाविकास आघाडीच्या शिलेदारांनी उरणची सभा गाजवली

# चहापेक्षा किटली गरम : सुषमा अंधारे

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण ।** उरण नगरपरिषदेच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात रंगात आलेला आहे. शनिवारी २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी उरणमध्ये महाविकास आघाडीच्या शिलेदारांनी दणक्यात जाहीर सभा घेतली. त्या सभेत खासदार आणि अभिनेते अमोल कोल्हे, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी तुफान बॅटिंग केली. उरणच्या सत्य परिस्थितीची पोलखोल नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणून जनतेसमोर आणली. तेव्हा विकासाच्या नावाने कोट्यवधींच्या गप्पा मारणाऱ्या उरणचे आमदार महेश बालदी यांचा सर्वांनी समाचार घेतला. त्यामुळे उरणची सभा प्रचंड गाजली.



यावेळी संसदरत्न खासदार अमोल कोल्हे म्हणाले, उरणच्या जनतेने मीठ पिकविले, त्या मिठाची तरी जाण सत्ताधाऱ्यांनी ठेवायला हवी होती. त्यांच्याच पदरी गेल्या दहा-पंधरा वर्षांत निराशा आली आहे. उरणमध्ये आज प्राथमिक सुविधाही नाहीत, ही खेदाची बाब आहे. दोन महापालिका १५ ते २० मिनिटांच्या अंतरावर आहेत. त्यामुळे उरण हे चकचकीत शहर असेल, असा माझा अंदाज होता, परंतु तो अंदाज येथे आल्यावर खोटा ठरला. निसर्गाने उरणला भरभरून दिले आहे, पण आज उरण शहर भकास झाल्याचे दृश्य दिसतेय. याचा जाब सर्वसामान्य जनतेने विचारलाच पाहिजे. आमच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार भावना घाणेकर या उरणच्या विकासासाठी सक्षम आहेत. त्यांच्यात धमक आहे. त्या भूमिपुत्र आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार आणि नगराध्यक्षपदी भावना घाणेकर निवडून येणे ही काळाची गरज आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बाळ्या मामा या सभेत गरजले. 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ!' 'जिसका राजा व्यापारी, प्रजा भिकारी', अशी बेरकी टीका बाळ्या मामा यांनी उरणमध्ये केली. ते पुढे म्हणाले, भूमिपुत्रांनो, आपापसांतल्या मतभेदांमुळेच उरणच्या डोक्यावर येऊन कोणी तरी बसले, आता वेळ गेलेली नाही. चूक सुधारा. नवी मुंबईच्या विमानतळाला दिबांचे नाव देण्याच्या हालचाली दिसत नाहीत, २० डिसेंबरपर्यंत जर केंद्र सरकारने निर्णय घेतला नाही तर मी २२ डिसेंबरला चालत भिवंडीवरून लाखोंच्या संख्येने विमानतळाला धडक देईन. दिबांचे नाव ही आपली अस्मिता आहे, तिला जर कोणी नख लावणार असेल तर भूमिपुत्र खपवून घेणार नाहीत, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

यावेळी शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे गरजल्या. त्या म्हणाल्या, चहापेक्षा किटली गरम. सध्या पीएंची चलती आहे. सध्या भाजपच्या काही नेत्यांच्या पीएंचे कारनामे चव्हाट्यावर येतायत. त्यातच आता उरणमध्ये कोणा शहा नावाच्या पीएंची बायको नगराध्यक्षपदासाठी उभी करून येथील भूमिपुत्रांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे. भूमिपुत्रांनो, सावध व्हा. रात्र वैऱ्याची आहे. डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवा आणि योग्य बटन दाबून भावना घाणेकर आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या. कोव्हिड काळात उद्धव ठाकरे यांनी शांतपणे काम केले, मात्र लशीच्या जाहिराती भाजपने केल्या. काँग्रेसने १४ लशी मोफत दिल्या, पण कधी जाहिरातबाजी केली नाही. सध्या फक्त जाहिरातबाजी सुरू आहे. देवेंद्र फडणवीस हे पक्षच फोडत नाहीत, तर कुटुंबही फोडतात, अशी खरमरीत टीका सुषमा अंधारे यांनी उरणमध्ये केली.

यावेळी आंतराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, भावना घाणेकर या रणरागिणी आहेत. त्या अनेक वर्षे समाजासाठी लढतायत, पायाला भिंगरी लावल्यागत त्या राज्याभर धडाडीने काम करीत आहेत. उरण शहर आज बकाल झाले आहे, त्याचा सर्वांगीण विकास व्हावा, म्हणून आम्ही महाविकास आघाडीचा सक्षम उमेदवार भावना घाणेकर यांच्या रूपाने दिला आहे. सत्ताधाऱ्यांना दिबांचा विसर पडला आहे. बोलघेवडे सत्ताधीश चालढकल करीत आहेत, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला अद्यापही दिबांचे नाव दिले गेले नाही. त्यामुळे आपल्या अस्मितेची ही लढाई आहे. हीच वेळ आहे सत्ताधीशांना जागा दाखवायची. त्यामुळे महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांना निवडून देऊन सत्ता परिवर्तनाची सुरुवात उरण भूमिपुत्रांच्या आणि हुतात्म्यांच्या नगरीतून करू या. यावेळी महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे सर्वच नेते उपस्थित होते. उरणचे आमदार महेश बालदी हे मग्रुर असल्याची महाविकास आघाडीच्या सर्वच नेत्यांची यावेळी भावना व्यक्त केली.खासदार संसदरत्न अमोल कोल्हे, खासदार सुरेश म्हात्रे, माजी आमदार मनोहरशेठ भोईर, रायगड जिल्हा अध्यक्ष काँग्रेस अध्यक्ष महेंद्रशेठ घरत, महाराष्ट्र नवनिर्माण सेना रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर, क्रॉ. भूषण पाटील, गोपाळ पाटील, नरेश रहाळकर, विनोद म्हात्रे, सुधाकर पाटील, रवि घरत, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# विकास कामांचे माप ओलांडलेय अजून खूप विकास कामे करायची आहेत : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । विजय गिरी**

**श्रीवर्धन ।** श्रीवर्धन नगरपालिका निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात येऊन पोहचला आहे, खासदार सुनील तटकरे यांच्या शहरातील कॉर्नर सभानां उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भाजपा युतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरातील कसबा पेठ, जिवनेश्वर मंदिर परिसर, पाच रस्ता चौक दांडा तसेच सरखोत मोहल्ला येथे आयोजित केलेल्या सभेत मार्गदर्शन करताना खास सुनील तटकरे म्हणाले की, नवीन वधू जशी सासरी गृह प्रवेश करताना माप ओलांडून गृह प्रवेश करुन नवीन जीवनाला सुरुवात करते, तशा प्रकारे आपण विकास कामांचे माप ओलांडून श्रीवर्धनचे नवीन पर्व सुरु केले आहे, करोडो रुपयांची विकास कामे करुन श्रीवर्धनचे रूप पालटण्यात यशस्वी झालो याचे समाधान आहे.



२०१६ च्या नगरपालिका निवडणुकीत पक्षाच्या वतीने जो जाहीरनामा काढला होता त्या जाहीरनामा ची पूर्तता करता आली याचा सार्थ अभिमान असल्याचे सांगितले.माझे ताईचे भाईचे शहराच्या विकासाकडे लक्ष असुन पुढे मोठ्या प्रमाणात विकासकामे करायची आहेत, विकास कामा मुळे पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे ही सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे, वाढत्या पर्यटक यांच्या वाहनांमुळे शहरात सुट्यांच्या दिवशी वाहतूक अडचण होत असते, लवकरच यावर उपाययोजना कारण्यासाठी शहरातील रस्ता रुंदीकरण किंवा बाह्य रस्ता पर्यायी मार्ग काढण्यात येईल, शहरात सौर विजेवर चालणारे पथ दिवे आपण लावण्यात यशस्वी झालो आहोत, त्याचे संपूर्ण शहरांत विस्तारिकरण लवकरच केले जाईल,उपजिल्हा रुग्णालयात या आधी दोन डायलीसीस मशीन उपलब्ध करुन किडनी बाधित रुग्णांना डायलीसिस साठी महाड अलिबाग येथे जाण्याचा त्रास कमी केला आहे, आणखी एक डायलीसिस मशीन आचार संहिता संपल्यानंतर आणून कार्यान्वित केली जाईल, दुर्दैवाने मशीनची गरज कोणाला पडू नये, परंतु किडनी बाधित रुग्णाला गैरसोय होऊ नये याचा आपला प्रयत्न आहे, रोह्याच्या धर्तीवर शहरांत मल्टीस्पेशल हॉस्पिटल लवकरच उभारले जाईल याची खात्री दिली.राज्यात कुठेही पाखाडी अंतर्गत साडेसात कोटी रुपायाचा अंतर्गत रस्ता नाही असा रस्ता शहरातील पाखाडित झालेला आहे.

शहरात बदल झाल्यामुळे पर्यटक वाढले आहेत, पर्यटनातून व्यवसाय रोजगार वाढत आ-हेत, पर्यटकांच्या माध्यमातून करोडोची उलाढाल होईल, लवकरच शहरात रोरो सेवा चालू झालेली आपल्याला पाहायला मिळेल, खगोल शास्त्र अभ्यासण्यासाठी आपण प्लॅटोरीयम उभारत असुन, वन उद्यान देखील झालेली लवकरच सर्वांना पाहायला मिळेल, डॉ के वाय राऊत यांनी विकासकामांना चालना मिळावी यासाठी २००९ मध्ये मला साथ दिली आणि संपूर्ण समाजाची ताकद पक्षाच्या मागे उभी केली, अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून जास्तीत जास्त कामे करता आली याचे समाधान असुन विकास कामांना पाठिंबा देण्यासाठी अनेक जण आपल्या प्रवाहात सहभागी होऊन पक्षाला ताकत देण्याचे काम करीत आहेत याचे देखील समाधान आहे श्रीवर्धचे पेटंट जगभरात प्रसिद्ध व्हावे यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल असेल सांगून घड्याळ आणि कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून आपल्या उमेदवारांना मोठ्या मतांनी विजयी करुन विरोधकांचे डिपॉजिट जप्त करा असे आवाहन केले, या वेळी नागराध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र सातनाक यांच्या सह नगरसेवक पदासाठी उभे असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे भाजपा युतीचे पदाधिकारी व उमेदवार उपस्थित होते.

# सात कोटींची फसवणूक, तिघांविरोधात गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रूम खरेदीधारकांनी खरेदी केलेले रूम न देता आणि रक्कम परत न करता वार्षिक व्याज परताव्याचे आमिष दाखवले आणि सात कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी अधिराज कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मालक निकुंज गुप्ता, ब्रिजभूषण गुप्ता आणि कुंजबिहारी गुप्ता यांच्या विरो-धात खारघर पोलीस ठाण्यात २६ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सुरज गुरव हे खारघर सेक्टर २१ येथे राहत असून त्यांनी अधिराज कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या रोहिंजण येथील साईटची पाहणी केली. त्यांनी ४३ व्या माळ्यावरील दोन रूमची खरेदी करण्याचे ठरवले. त्यांनी बुकिंग रक्कम २७ लाख ५९ हजार चेक द्वारे दिली. आणि दोन रूम बुक केले. त्यानंतर वेळोवेळी त्यांनी एक कोटी ४९ लाख इतकी रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर केली आणि त्याच्या पावत्या त्यांना मिळाल्या. काही दिवसांनी त्यांना रूम खरेदी धारक हे त्यांना कंपनीला देणे असलेल्या भविष्यातील हप्त्यासाठी आगाऊ पैसे भरू शकता आणि आगाऊ कालावधीत त्या रकमेवर नऊ टक्के वार्षिक व्याज मिळवू शकतात अशा प्रकारची योजना असल्याची माहिती देण्यात आली. इतर रूम खरेदी धारक यांनी या ठिकाणी रूम खरेदीची रक्कम अदा केलेली आहे. तसेच अनेकांनी नऊ टक्के वार्षिक व्याज मिळवण्याच्या योजनेत पैसे भरले. मनीष कुमार, के व्ही. चरणतेज, परमानंद जैन, अनिल पुजारी, भरत झुंजारे, मनोज मल्होत्रा, आदित्य अपूर्वा, सौरभ नायर यांनी या योजनेत पैसे गुंतवले. आठ जणांनी सात कोटी २९ लाख ५७८ एवढी रक्कम अधिराज कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या नावे असलेल्या बँक खात्यावर पाठवली आहे. मात्र रूम दिले नाहीत आणि गुंतवणूक केलेली मूळ रक्कम परत केली नाही तसेच वार्षिक व्याज परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक केली.

# पोलादपूर पोलिसांची कारवाई ; ४ बैलांसह ३ गाडया जप्त, तिघे अटकेत



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर पोलीस स्टेशन हद्दीतील असलेल्या माटवण बौध्दवाडी येथून बेकायदेशीररीत्या गुरे वाहून नेण्यात येत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळताच त्यांनी तातडीने पोलादपूर पोलिसांना कळविले. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे व पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन चार बैलांसह तीन वाहनेही जप्त करीत तिघे आरोपी ताब्यात घेतल्याची माहिती प्राप्त झाली.

पोलादपूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तीन वाहनांतून चार बैलांची वाहतूक होणार असल्याची खबर गोरक्षकांना मिळाल्याने त्यांनी पोलादपूर पोलीसांना खबर दिली. त्यामुळे सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांच्यासह पोलीसांनी तातडीने माटवण बौध्दवाडी परिसरात पोहोचून तानाजी गणपत मोरे (वय २६, रा. सुतार आळी, बिरवाडी, ता. महाड) विशाल लक्ष्मण म्हस्के (वय ३१, रा. माटवण, ता.पोलादपूर) आणि लहू महादेव वेनुपुरे (वय २६, रा. मु.पो. हिरडोशी, ता. भोर, जि. पुणे) या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातील सफेद रंगाची पिकअप (एमएच०६सीपी०१६९) व पिकअप (एमएच १२ एएम ७६४९) तसेच स्विफ्ट (एमएच ११ डीएन ८१५८) या तीन वाहनांना पोलिसांनी जप्त केले.

या वाहनांत एकूण चार बैल आढळून आले. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार एन. पी. कोंडाळकर करत आहेत.

### चौल दत्त मंदिरातील चोरीचा तपास लागेना...

# चार वर्षांनंतरही चोरटे मोकाटच; भक्तांकडून नाराजी

**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त मंदिरामध्ये अज्ञात चोरट्यांनी १७ डिसेंबर २०२२ रोजी चोरी करुन मूर्तींच्या मागे लावलेली सुमारे ४० किलो चांदी लंपास केली होती. ११ डिसेंबरला येथील यात्रा संपल्यानंतर ही चोरी झाली होती. या चोरीचे सीसीटीव्ही फुटेज मिळाले असून, तपासासाठी रायगड जिल्हा पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक तयार करण्यात आले आहे. परंतु, चार वर्षांचा कालावधी उलटूनही चोरीचा तपास लावण्यात पोलिसांना अपयश आल्याने दत्तभक्तांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

रायगड जिल्ह्यातील मंदिरांतील दानपेट्या फोडून पैसे, देवाच्या चांदीच्या मूर्ती चोरीला गेल्याचे अनेक गुन्हे घडले आहेत. त्यातील काही चोऱ्यांचा तपास लावण्यात पोलिसांना यश आले असले तरी तालुक्यातील प्रसिद्ध चौल-भोवाळे येथील दत्त मंदिरातील चोरीचा छडा अद्याप पोलिसांना ला-गलेला नाही. आरोपी सापडत नसल्याने पोलिसांनी तपास करण्याचे सोडून दिले की काय, अशी भावना दत्तभक्तांकडून व्यक्त करण्यात येत आहे. चौल मंदिरा-तील ४० किलो चांदी चोरीला गेल्याची घटनेला आता चार वर्षे होतील; परंतु, अद्याप तपास लागलेला नाही. यंदा चौल-भोवाळे येथील दत्तयात्रेला गुरुवार, दि. ४ डिसेंबरपासून प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर दत्त मंदिरातील चोरीच्या चर्चेला पुन्हा एकदा उधाण आले आहे.

चौल-भोवाळे येथील दत्त मंदिरात चार वर्षांपूर्वी चोरी झाली होती. या मंदिरातील तब्बल चाळीस किलो चांदीची प्रभावळ चोरीला गेली होती. मंदिरा-तील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन चोरट्यांचे छायाचित्रण आढळून आले आहे. रेवदंडा पोलीस ठाण्यात चार वर्षांमध्ये तीन अधिकारी बदलून आले. परंतु, एकाही अधिकाऱ्याला या चोरीचा तपास करता आला नाही. सध्याचे प्रभारी अधिकारी श्रीकांत किरवले यांच्याशी संपर्क साधून तपासाबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.



यावर्षी गुरुवार, दि. ४ डिसेंबरपासून दत्तयात्रेला प्रारंभ होत आहे. दरवर्षी या ठिकाणी पाच दिवसांची यात्रा भरते. जिल्ह्यासह राज्य-परराज्यातील अनेक व्यावसायिक या यात्रेत व्यवसायासाठी येत असतात. त्यातून लाखो रुपयांची उलाढाल होत असते. बाहेरुन येणाऱ्या अनोळखी व्यावसायिकांबरोबर सर्वच व्यावसायिकांची नोंदणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी आतापासूनच प्रभावी यंत्रणा राबविण्यात यावी, अशी मागणी दत्तभक्तांकडून होत आहे.

मंदिरात चोरी झाली तेव्हा रेवदंडा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे होते. त्यांनी ग्रामस्थांना चोरांचा छडा लावून लवकरच जेरबंद करू, असे ठाम आश्वासन दिले होते. परंतु, चार वर्षांनंतरही चोर पकडले गेलेले नाहीत. एकही धागा हाती लागलेला नाही. तपास आजही तिथेच अडकलेला आहे. तत्कालिन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण विभाग उतरला, स्पेशल पथक नेमले गेले, चौकशीचे ढोल बडवले गेले. मात्र, कुठलाही सुगावा नाही.

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक म्हणून आंचल दलाल यांनी कारभार हाती घेतल्यापासून अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत. तसेच, कामात कसूर करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचाही त्यांनी चांगला बंदोबस्त केल्याचे समजते. त्यामुळे आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली दत्त मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्यांना पकडण्यासाठी आता तरी तपासाची चक्रे गतीने फिरतील, अशी तमाम दत्तभक्तांची आशा आहे.

आतापर्यंत चोर सापडणे गरजेचे होते, अशी माझ्यासह सर्वच दत्तभक्तांची भावना आहे. यामध्ये फक्त बाहेरचेच आहेत की आपल्याकडील कोण आहेत, हे कळायला तर हवेच. नुसता चोरीचा माल मिळणे महत्त्वाचे नाही, तर चोर पकडणे गरजेचे आहे.